# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा मुंबई

कंत्राटी पद भरती प्रक्रिया

कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई

जाहिरात

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मुंबई जिल्ह्यासाठी पदभरती प्रक्रिया कंत्राटी व करार तत्वावर पध्दतीने मानधन तत्वावर खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| Sr.No. | Name of post | No. of post | Categorywise post | Educational Qualification | Place of Posting | Remuneration per Month |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Staff Nurse | 16 | SC - 2<br>ST- 1<br>VJA - 1<br>NTB - 0<br>NTC - 1<br>NTD - 0<br>SBC - 0<br>OBC - 3<br>EWS - 2<br>OPEN - 6 | GNM | Superintendent, Cama & Albless Hospital, Mumbai 400001 | 20,000/- |

सदर पदासाठीचा अर्ज, अटी व शर्ती ह्या संस्थेच्या www.camahospital.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. अर्ज सादर करण्याचा कालावधी दि.०१/०३/२०२३ ते ०९/०३/२०२३. सायं. ६.०० वाजेपर्यंत

All post education criteria is of relevant educational qualification.

**अटी व शर्ती :-**

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज २) वयाचा पुरावा/दाखला ३) पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षांचे प्रमाणपत्र) ४) गुणपत्रिका ५) शासकीय/निमशासकीय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी तथा नाव व मोबाईल क्रमांकासह ६) अनुभव सबंधितच असावा ७) जात/ जात वैधता प्रमाणपत्र इ. छायांकित प्रतीसह दिनांक ०१/०३/२०२३ ते दिनांक ०९/०३/२०२३ या कालावधीत सांय. ६.०० वा. पर्यंत (शासकीय सुट्या वगळून) **वैद्यकीय अधिक्षक, कामा व आल्ब्लेस रुग्णालय, महापालीका मार्ग, मुंबई ४००००१** या पत्यावर पोस्टाद्वारे, कुरियर अथवा प्रत्यक्षात हस्त पोंच (By Hand) सादर करण्यात यावे.

२) सामन्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुबंई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करिता ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. शारीरीक योग्यता (Physical Fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

३) शासकिय कर्मचारी यांच्या पुर्वीच्या शासकिय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

४) मुलाखातीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा कुठलाही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.



CS Scanned with CamScanner

५) खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता रु. १५०/- राखीव प्रवर्गातील उमेदवाराकरिता रु. १००/- चा डिमांड ड्राफ्ट् जोडणे आवश्यक आहे. सदरचा डिमांड ड्राफ्ट "Superintendent, Cama & Albless Hospital, Mumbai" या नावाने असावा. डिमांड ड्राफ्ट च्या गागे स्वत:चे नाव व पदाचे नाव स्वहस्ताक्षरात लिहावे, कोणत्याही कारणास्तव डिमांड ड्राफ्ट बँकेत न वठल्यास संबंधिताचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल .

६) पदासमोर नमुद मानधन असुन त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

७) लहान कुटुंबाची अट दि.२३/०७/२०२० पासुन लागु करण्यात आली असून दि. २३/०७/२०२२ पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पद भरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

८) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची असुन **दि.३१/०७/२०२३** रोजी पर्यतच्या कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत. पुढील पुनर्नियुक्ती (१ वर्षाच्या कालावधीकरिता) आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधारीत असेल.

९) राज्यस्तरीय वेळोवेळीच्या सुचनांच्या अधिनस्त कार्यवाही करण्यात येईल.

१०) प्राप्त झालेल्या अर्जावरुन Qualifying Exam मध्ये मिळालेले अंतिम वर्षाचे गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकिय / निमशासकीय / राष्ट्रीय आरोग्य अभियान कामकाजाचा अनुभव या बाबींचे गुणांवरुन समितीद्वारे मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल सदर मेरीट लिस्ट या www.camahospital.org संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी सदरबाबत आक्षेप असल्यास दोन दिवसांत आपले आक्षेप नोदंवावे. तद्नंतर प्राप्त आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी. विहीत मुदतीत प्राप्त आक्षेपांचा विचार करुन अंतिम मेरीट लिस्ट उपरोक्त शासकीय संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

११) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या कर्मचाऱ्याने राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त झाल्यास प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. सदर गुणवत्ता यादी प्रसिध्द केल्यानंतर एक वर्ष कालावधीकरीता ग्राह्य धरण्यात येईल.

१२) वरिल नमूद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची/मानधनाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क/दावा राहणार नाही, तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू राहणार नाहीत.

१३) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पदे नामंजूर केल्यास उमेदवारांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१४) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१५) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्याचे साईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.



CS Scanned with CamScanner

१६) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेल्या मोबाईल व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा तसेच ते भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१७) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या उमेदवारांना बोलवण्यात येईल त्या वेळेस त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल, यासाठी कोणताही खर्च देण्यात येणार नाही.

१८) अर्जाचा नमुना हा जाहीरातीसोबत प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास उमेदवाराचा अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१९) उमेदावाराचा अर्ज अपूर्ण किंवा अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवाराला तक्रार करता येणार नाही.

२०) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- (रुपये शंभर/-) च्या बॉण्ड (बंधपत्र) पेपरवर करारनामा पदावर रुजू होतांना सादर करावा लागेल.

२१) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ (सात) दिवसांत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अथवा त्यांचे नियुक्ती आदेश संपुष्टात आणून प्रतिक्षाधिन यादीतील पूढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात.

२२) भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी-जास्त, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे इ. सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.वैद्यकीय अधिक्षक, कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई यांनी राखून ठेवलेले आहेत. इतर अटी व शर्ती या संस्थेच्या www.camahospital.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

स्वाक्षरी

अध्यक्ष
निवड समिती
वैद्यकीय अधिक्षक,
कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई

वृत्तपत्र :- दै.लोकसत्ता जाहिरात प्रसिध्द दिनांक २५/०२/२०२३



CS Scanned with CamScanner